


# सुरक्षित गर्भपात... मान्यताप्राप्त गर्भपात केंद्रामध्येच.

## गर्भपात कायदेशीर केव्हा असतो ?

- गर्भधारणेमुळे आईच्या जीवाला धोका असेल तर...
- गर्भामध्ये शारीरिक अथवा मानसिक व्यंग असेल तर...
- गर्भधारणा ही बलात्कारामुळे झाली असेल तर...
- संतती नियमनाच्या साधनांचा वापर योग्य तऱ्हेने न केल्यामुळे गर्भ राहिला असेल तर...



अधिक माहितीसाठी नजिकच्या आरोग्य केंद्रात अथवा सरकारी दवाखान्यात संपर्क साधा.

राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे.

# सुरक्षित गर्भपात... मान्यताप्राप्त गर्भपात केंद्रामध्येच.



## गर्भपात कधी करावा ?

- गर्भपात फक्त २० आठवड्यांपर्यंतच करण्यास कायद्याची मान्यता आहे.
- १२ आठवड्यांपर्यंत तो एक मान्यताप्राप्त वैद्यकीय चिकित्सकाकडे करता येतो.
- १२ ते २० आठवड्यांपर्यंत तो दोन वैद्यकीय चिकित्सकांच्या सल्ल्याने करता येतो.

## गर्भपात कोण करू शकतो ?

**गर्भपात फक्त तीच व्यक्ती करू शकते जी –**

- नोंदणीकृत वैद्यकीय चिकित्सक आहे व मान्यताप्राप्त वैद्यकीय शिक्षण घेतलेले आहे.
- प्रशिक्षित आणि अनुभवी स्त्रीरोग तज्ज्ञ आहे.

## गर्भपात करण्यासाठी कोणाची परवानगी आवश्यक आहे ?

- ज्या स्त्रीला गर्भपात करून घ्यायचा आहे फक्त त्या स्त्रीची परवानगी आवश्यक आहे.
- १८ वर्षाखालील मुलीस तिच्या पालकांची परवानगी आवश्यक आहे.
- स्त्री जर मानसिक रुग्ण असेल तर तिच्या पालकांची परवानगी आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी नजिकच्या आरोग्य केंद्रात अथवा सरकारी दवाखान्यात संपर्क साधा.

राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे.